


आपलं महानगर मंगळवार २४ सप्टेंबर २०२४

# सिडकोच्या पाणी पुरवठा प्रकल्पांची पाहणी

## कंत्राटदारांना वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना

**नवी मुंबई।** सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सिडकोच्या विविध पाणी पुरवठा योजनांच्या प्रकल्पस्थळांना भेट दिली. सिडकोतर्फे राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा घेतला. संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

व्यवस्थापकीय संचालक यांनी २७० एमएलडी, हेटवणे पाणी पुरवठा आवर्धन योजनेच्या प्रकल्प स्थळास भेट दिली. त्यानंतर त्यांनी सिडको विमोचकाचे स्थळ व हेटवणे धरणाच्या पायथ्याशी प्रस्तावित असलेल्या प्रक्रीया विरहित पाण्याच्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहीरीची पाहणी केली. त्याचप्रमाणे जिते येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या स्थळासोबतच नव्याने साकारण्यात येत असलेल्या २७० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. येथे बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहीरीच्या कामाची पाहणी केली. त्याचबरोबर येथे प्रस्तावित असलेल्या एप्रोच व टेल टनेलच्या कामाचा शुभारंभ देखील व्यवस्थापकीय संचालक सिंघल यांच्या हस्ते करण्यात आला.




महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४

# ‘हस्तांतरण शुल्काबाबत हिताचा निर्णय घ्या’

**म.टा. वृत्तसेवा, नवी मुंबई**

घर हस्तांतर करताना, सिडकोकडून प्रत्येक वेळी घेतले जाणारे हस्तांतरण शुल्क रद्द करावे, यासाठी नवी मुंबईत लोक चळवळ उभी राहिली आहे. यानुसार, हा विषय आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहोचला आहे. मुख्यमंत्र्यांनी याचे गांभीर्य लक्षात घेत, सिडको हस्तांतरण शुल्काबाबत नवी मुंबईच्या हिताचा निर्णय घ्या, अशी सूचना सिडकोचे नवनियुक्त अध्यक्ष

## सिडको अध्यक्षांना मुख्यमंत्र्यांच्या सूचना

आमदार संजय शिरसाट यांना केली आहे. त्यामुळे लवकरच हा प्रश्न निकाली निघण्याची आशा निर्माण झाली आहे.

नवी मुंबईत घर हस्तांतरित करताना सिडकोच्या वतीने, आकारले जाणारे हस्तांतरण शुल्क रद्द करावे यासाठी नवी मुंबईतील अनेक संघटना एकटवल्या आहेत. त्यांनी याविरोधात मोहीम सुरू केली आहे. या अंतर्गत, ते सर्व सामाजिक संघटना नागरिक, राजकीय नेते यांची भेट घेत आहेत. याच अंतर्गत शिवसेना शिंदे गटाचे उपनेते विजय नहाटा यांच्याकडे त्यांनी पाठिंबा मिळण्यासाठी मागणी केली होती. या मागणीनुसार नहाटा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची या विषयाच्या निमित्ताने भेट घेतली. यावेळी सिडको हस्तांतरण शुल्क रद्द करण्याची मागणी त्यांच्याकडे केली. त्यावर

मुख्यमंत्री शिंदे यांनी सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांना बोलावून तत्काळ याबाबत नवी मुंबईतील जनतेच्या हिताचा निर्णय घेण्याबाबत प्रत्यक्ष सूचना दिल्या. तसेच विजय नाहटा यांच्या निवेदनावर लिखित स्वरूपात प्रस्तावाबाबत आदेश दिले.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 4 Sep 24, 2024

# नवी मुंबई-मुंबई विमानतळ लवकरच मेट्रोने जोडणार

## शंतनू गोयल : प्रवास आणखीन वेगवान; विकासाला मिळणार चालना

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : भविष्यात नवी मुंबई आणि मुंबई विमानतळाचा प्रवास सुखकर आणि जलद करण्यासाठी ३५ किमी मेट्रो मार्गिका सुरू केली जाणार असून त्याचा मार्ग समुद्रातूनही जाणार असल्याची माहिती सिडकोचे मॅनेजिंग डायरेक्टर शंतनू गोयल यांनी दिली. मेट्रोचे आणखीही मार्ग कार्यरत असल्याने दळणवळण वेगाने होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ठाणे विकास परिषद २०२४ अंतर्गत आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी कल्याण ते तळोजा या मार्गावर मेट्रो सुरू केली जाणार आहे. तळोजा बेलापूर, बेलापूर ते नवी मुंबई विमानतळ या मार्गावर मेट्रो प्रकल्प सुरू करणार आहे. तसेच इतर विकास प्रकल्पांना चालना दिली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पर्यावरणाचा समतोल राखायचा असेल तर त्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविला पाहिजे. ई चार्जिंग स्टेशनची निर्मिती त्यासाठी केली जात असल्याची माहिती पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांनी सांगितले.

प्लास्टिक पिशव्यांचा वापर हा आजही होताना दिसत आहे. त्यावर नियंत्रण आणून कागदी आणि कापडी पिशव्यांच्या वापराला प्राधान्य देणे गरजेचे आहे. गरज असल्यास विजेचा वापर करावा, विजेची बचत कशी करता येईल, या दृष्टीने देखील पावले उचलणे गरजेचे आहे. ग्रीन कव्हर वाढविण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय शासनाच्या प्रकल्पांचे क्लिअरन्स किंवा विकासकांना क्लिअरन्स लवकरात लवकर कसा दिला जाईल, यासाठी नियोजन आखण्यात आले आहे. सध्या एकही फाईल पेंडिंग नसल्याचा दावा त्यांनी यावेळी केला.



### सरकारचे धोरण लागू

- एमएमआर हे पर्यटन केंद्र बनू शकते. किनारपट्टीच्या जमिनीत गुंतवणुकीची मोठी क्षमता आहे. मात्र, त्यात गुंतवणूक करताना काही सवलत देण्याची मागणी गुंतवणूकदारांनी केली. त्याला उत्तर देताना पर्यटन विकास महामंडळाचे संचालक बी. एन. पाटील म्हणाले की, राज्य सरकारने पर्यटनाला चालना देण्यासाठी नवीन धोरण लागू केले आहे. त्याचे पडसाद येत्या काही दिवसांत उमटतील.

### प्रशिक्षणाची गरज

- उद्योजक प्रशांत करमरकर म्हणाले की, आजही आपण मागणीनुसार रोजगार देऊ शकत नाही. त्याचे प्रमुख कारण कुशल कामगार आणि तंत्रज्ञांची कमतरता आहे. १० वी, १२ वी नापास तरुणांना रोजगार मिळण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. इतर प्रशिक्षणाची गरज असल्याने शाळा-महाविद्यालयांमध्ये सेमिनारचे आयोजन करण्यात यावे.

नवराष्ट्र | मुंबई, २४ सप्टेंबर २०२४

# कंत्राटदारांनी वेळेत काम पूर्ण करा: विजय सिंघल



नवी मुंबई, (वा.) २३ सप्टेंबर २०२४ रोजी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल यांनी सिडकोच्या विविध पाणी पुरवठा योजनांच्या प्रकल्पस्थळांना भेट देऊन, सिडकोतर्फे राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा घेतला व संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. या प्रसंगी गणेश देशमुख, शीला करूणाकरण, पी. व्ही. मूल सिडको व अन्य संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी २७० एमएलडी, हेटवणे पाणी पुरवठा आवर्धन योजनेच्या प्रकल्प स्थळास भेट दिली. त्यानंतर त्यांनी सिडको विमोचकाचे स्थळ व हेटवणे धरणाच्या पायथ्याशी प्रस्तावित असलेल्या प्रक्रीया विरहित पाण्याच्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहीरीची पाहणी केली. त्याचप्रमाणे जिते येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या स्थळासोबतच नव्याने साकारण्यात येत असलेल्या २७० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राच्या सद्यस्थितीचीदेखील पाहणी केली. याचबरोबर प्रक्रिया विरहित व

> सिडको अधिकारक्षेत्रातील भविष्यातील वाढत्या लोकसंख्येची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी सिडकोतर्फे विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. सोमवारी त्यातील महत्वाच्या स्थळांची पाहणी केली असता सर्व कामे समाधानकारकरित्या प्रगतीपथावर असल्याचे दिसून आले आहे. ही कामे वेळेवर पूर्ण व्हावी. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचनादेखील दिल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात सिडको अधिकारक्षेत्रातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा होईल यात शंका नाही.
>
> **-विजय सिंघल**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

प्रक्रिया केलेल्या पाण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहीरीच्या कामाचीदेखील त्यांनी पाहणी केली. याचबरोबर साई गावातील बांधकाम विहीरीची देखील त्यांनी पाहणी केली. त्याचबरोबर येथे प्रस्तावित असलेल्या एप्रोच व टेल टनेलच्या कामाचा शुभारंभदेखील सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, विजय सिंघल यांच्या हस्ते करण्यात आला.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत मुंबई, मंगळवार, दि. २४ सप्टेंबर २०२४

# सिडकोची गोड बातमी : दसऱ्याआधी निवडा तुमच्या आवडीचे घर

## 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर राबवणार २५ हजार घरांची बंपर विक्री योजना

कमलाकर कांबळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात दसऱ्याआधी २५ हजार घरे विक्रीसाठी उपलब्ध करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. 'निवडा तुमच्या आवडीचे घर' या संकल्पनेअंतर्गत 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर ही घरे उपलब्ध होतील. त्यांच्या किमतीही बाजारभावापेक्षा कमी असतील, अशी माहिती सिडकोचे एमडी विजय सिंघल यांनी 'लोकमत'ला दिली.

### अल्प उत्पन्न घटकांना लाभ

१ शहराच्या विविध भागांतील २७ ठिकाणी ही ६७ हजार घरे बांधण्याचे प्रस्तावित आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यातील ४३ हजार घरांना 'महारेरा'ची परवानगी प्राप्त झाली असून त्यांचे बांधकामही प्रगतिपथावर आहे.

२ ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात यातील २५ हजार घरे विक्रीसाठी उपलब्ध करण्याची योजना आहे. यातील बहुतांशी घरे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी असणार आहेत, असे विजय सिंघल यांनी स्पष्ट केले.

### कुठल्या घरांचा होणार समावेश?

- दरम्यान, सिडकोचे नवनियुक्त अध्यक्ष संजय शिरसाट हे मंगळवारी विविध भागातील गृहप्रकल्पांच्या कामांची पाहणी करणार आहेत. प्रस्तावित योजनेत कोणत्या विभागातील घरांचा समावेश करायचा याचा आढावा घेणार आहेत.
- त्यानंतर पुढील दोन-तीन दिवसांत अंतिम आराखडा तयार करून योजना जाहीर केली जाईल. या योजनेत तळोजा, द्रोणागिरी, कळंबोली, खांदेश्वरसह मानसरोवर, खारघर, जुईनगर आणि वाशी येथील घरांचा समावेश असण्याची शक्यता आहे.



### मार्केटिंग कंपनीचे भवितव्य अधांतरी?

- घरांचे मार्केटिंग आणि विक्री करण्यासाठी सिडकोने नियुक्त केलेल्या सल्लागार संस्थेचा वाद मागील दीड वर्षापासून नगरविकास विभागाकडे निवाड्याच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे नवीन गृहयोजना जाहीर करताना सिडकोची कोंडी होत आहे.
- मात्र, आता अधिक प्रतीक्षा न करता या घरांच्या विक्रीसाठी 'बुक माय सिडको होम' अर्थात 'निवडा तुमच्या आवडीचे घर' या संकल्पनेचा अवलंब करण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे.
- याअंतर्गत ग्राहकांना 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्त्वावर त्यांच्या पसंतीचे घर उपलब्ध करून दिले जाणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन असणार आहे. याअंतर्गत विमान तिकिटाच्या धर्तीवर ग्राहकांना आपल्या पसंतीचे घर सिलेक्ट करण्याचे स्वातंत्र्य असणार आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

सकाळ मुंबई, मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४

# पाणीपुरवठ्याची कामे वेळेत पूर्ण करा!

## सिडकोकडून प्रकल्पांची पाहणी

नवी मुंबई, ता. २३ : सिडकोतर्फे पाणीपुरवठा सुधारण्याकरिता करण्यात येत असणारी सर्व तांत्रिक कामे वेळेवर पूर्ण करा, अशा सूचना सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केल्या. आज सिंघल यांनी अधिकाऱ्यांसोबत सिडकोच्या विविध पाणीपुरवठा प्रकल्पांची पाहणी केली.

सिंघल यांनी आज दुपारपासून सिडकोच्या विविध पाणीपुरवठा योजनांच्या प्रकल्पस्थळांना भेटी दिल्या. सिडकोतर्फे राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा घेतला. संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. याप्रसंगी गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, शीला करुणाकरन, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व विशेष प्रकल्प), सिडको, पी. व्ही. मूल, अधीक्षक अभियंता, सिडको व अन्य संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सिंघल यांनी २७० एमएलडी हेटवणे पाणीपुरवठा आवर्धन योजनेच्या प्रकल्पस्थळास भेट दिली. त्यानंतर त्यांनी सिडको विमोचकाचे स्थळ व हेटवणे धरणाच्या पायथ्याशी प्रस्तावित असलेल्या प्रक्रियाविरहित पाण्याच्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहिरीची पाहणी केली. त्याचप्रमाणे जिते येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या स्थळासोबतच नव्याने साकारण्यात येत असलेल्या २७० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राच्या सद्यस्थितीची पाहणी केली. साई गावातील बांधकाम विहिरीची त्यांनी पाहणी केली. त्याचबरोबर प्रस्तावित असलेल्या एप्रोच व टेल टनेलच्या कामाचा शुभारंभदेखील विजय सिंघल यांच्या हस्ते करण्यात आला.



विजय सिंघल पाहणी करताना.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मुंबई, मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ महामुंबई पुढारी

# पेणच्या साई गावातील अ‍ॅप्रोच व टनेलचे काम ऑक्टोबरअखेर सुरू करणार : सिडको एमडी सिंघल



नवी मुंबई : विविध प्रकल्पांच्या कामांची माहिती घेताना सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल

नवी मुंबई: पुढारी वृत्तसेवा

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सोमवारी पेण येथील साई गावातील प्रस्तावित एप्रोच व टेल टनेलच्या कामाची पाहणी केली. या जल बोगद्याचे काम संयंत्राद्वारे ऑक्टोबरअखेर सुरुवात करण्यात येईल. यावेळी सिडकोच्या विविध पाणी पुरवठा योजनांच्या प्रकल्पस्थळांना त्यांनी भेट दिली. तसेच राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा घेतला. यावेळी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, शीला करूणाकरण, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व विशेष प्रकल्प), पी. व्ही. मूल, अधीक्षक अभियंता, सिडको व अन्य संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

व्यवस्थापकीय संचालक सिंघल यांनी २७० एमएलडी, हेटवणे पाणी पुरवठा आवर्धन योजनेच्या प्रकल्प स्थळास भेट दिली. त्यानंतर त्यांनी सिडको विमोचकाचे स्थळ व हेटवणे धरणाच्या पायथ्याशी प्रस्तावित असलेल्या प्रक्रीया विरहित पाण्याच्या बोगद्यासाठी तयार केलेल्या बांधकाम विहिरीची पाहणी केली. त्याचप्रमाणे जिते येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या स्थळासोबतच नव्याने साकारण्यात येत असलेल्या २७० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राच्या सद्यस्थितीचीही पाहणी केली.

याचबरोबर प्रक्रिया विरहित व प्रक्रिया केलेल्या पाण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहिरींच्या कामाची तसेच साई गावातील बांधकाम विहिरीचीही व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी पाहणी केली.

> सिडको अधिकार क्षेत्रातील भविष्यातील वाढत्या लोकसंख्येची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी सिडकोतर्फे विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. आज त्यातील महत्त्वाच्या स्थळांची पाहणी केली असता सर्व कामे समाधानकारकरित्या प्रगतिपथावर असल्याचे दिसून आले. ही कामे वेळेवर पूर्ण व्हावीत यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात सिडको अधिकार क्षेत्रातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा होईल यात शंका नाही.
>
> -विजय सिंघल
> उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

**प्रातःकाल** मुंबई, मंगळवार दि. २४ सप्टेंबर २०२४

# विजय सिंघल यांनी केली सिडकोच्या विविध पाणी पुरवठा प्रकल्पांची पाहणी

**मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी) :** सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिनांक २३ सप्टेंबर २०२४ रोजी, सिडकोच्या विविध पाणी पुरवठा योजनांच्या प्रकल्पस्थळांना भेट देऊन, सिडकोतर्फे राबवण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांचा आढावा घेतला व संबंधित अधिकारी व कंत्राटदारांना सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. या प्रसंगी श्री. गणेश देशमुख, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्रीमती. शीला करूणाकरण, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व विशेष प्रकल्प), सिडको, श्री. पी. व्ही. मूल, अधीक्षक अभियंता, सिडको व अन्य संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



सिडको अधिकारक्षेत्रातील भविष्यातील वाढत्या लोकसंख्येची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी सिडकोतर्फे विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. आज त्यातील महत्वाच्या स्थळांची पाहणी केली असता सर्व कामे समाधानकारकरित्या प्रगतीपथावर असल्याचे दिसून आले आहे. सदरची कामे वेळेवर पूर्ण व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचनादेखील दिल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात सिडको अधिकारक्षेत्रातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा होईल यात शंका नाही.

**- श्री. विजय सिंघल,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

सर्वप्रथम उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी २७० एमएलडी, हेटवणे पाणी पुरवठा आवर्धन योजनेच्या प्रकल्प स्थळास भेट दिली. त्यानंतर त्यांनी सिडको विमोचकाचे स्थळ व हेटवणे धरणाच्या पायथ्याशी प्रस्तावित असलेल्या प्रक्रीया विरहित पाण्याच्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहीरीची पाहणी केली. जलशुद्धीकरण केंद्राच्या स्थळासोबतच नव्याने साकारण्यात येत असलेल्या २७० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राच्या सद्यस्थितीचीदेखील पाहणी केली. प्रक्रिया विरहित व प्रक्रिया केलेल्या पाण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहीरीच्या कामाचीदेखील त्यांनी पाहणी केली. याचबरोबर साई गावातील बांधकाम विहीरीची देखील त्यांनी पाहणी केली. त्याचबरोबर येथे प्रस्तावित असलेल्या एप्रोच व टेल टनेलच्या कामाचा शुभारंभदेखील सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, श्री. विजय सिंघल यांच्या हस्ते करण्यात आला. सदर जल बोगद्याचे काम संयंत्राद्वारे ऑक्टोबर अखेर सुरूवात करण्यात येईल.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM महामुंबई



# सिडको व्यवस्थापकीय संचालकाकडून पाणीपुरवठा प्रकल्पांचा आढावा

लोकसत्ता प्रतिनिधी

**नवी मुंबई :** सिडकोच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी सोमवारी सिडकोच्या विविध पाणी पुरवठा योजनांच्या प्रकल्पस्थळांना भेट देऊन तेथे सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला. तसेच सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांना सर्व कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देखील दिल्या. यावेळी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व विशेष प्रकल्प) श्रीमती. शीला करूणाकरण, पाणी पुरवठा विभागाचे अधीक्षक पी. व्ही. मूल, अन्य अधिकारी उपस्थित होते.

सोमवारी पहिल्यांदा सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक सिंघल यांनी २७० दश लक्ष लीटर (एमएलडी) हेटवणे येथील पाणी पुरवठा आवर्धन योजनेच्या प्रकल्प स्थळास भेट दिली. त्यानंतर त्यांनी सिडको विमोचकाचे स्थळ व हेटवणे धरणाच्या पायथ्याशी प्रस्तावित असलेल्या प्रक्रीया विरहित पाण्याच्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहीरींची (शाफ्ट) पाहणी केली. त्याचप्रमाणे जिते येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या स्थळासोबतच नव्याने साकारण्यात येत असलेल्या २७० एमएलडी जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. याचबरोबर प्रक्रिया विरहित व प्रक्रिया केलेल्या पाण्यासाठी बांधण्यात येत असलेल्या बोगद्यासाठी तयार करण्यात आलेल्या बांधकाम विहीरीच्या कामाचा देखील आढावा घेतला. साई गावातील बांधकाम विहीरींची देखील त्यांनी पाहणी केल्यानंतर येथे प्रस्तावित असलेल्या एप्रोच व टेल टनेलच्या कामाचा शुभारंभदेखील सिडकोचे व्यवस्थापकीय संचालकांच्या हस्ते करण्यात आला. सदर जल बोगद्याचे काम संयंत्राद्वारे ऑक्टोबर अखेर सुरुवात करण्यात येणार आहे.

> सिडको अधिकारक्षेत्रातील भविष्यातील वाढत्या लोकसंख्येची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी सिडकोतर्फे विविध उपाययोजना राबवण्यात येत आहेत. आज त्यातील महत्वाच्या स्थळांची पाहणी केली असता सर्व कामे समाधानकारकरित्या प्रगतीपथावर असल्याचे दिसून आले आहे. सदरची कामे वेळेवर पूर्ण व्हावी यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचनादेखील दिल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात सिडको अधिकारक्षेत्रातील नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा होईल यात शंका नाही.
>
> **विजय सिंघल**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

मुंबई | मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ प्रहार

## वेचक

# संजय शिरसाट यांनी स्वीकारला पदभार

**नवी मुंबई :** अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या सिडकोच्या मंत्रीपदाचा दर्जा असलेल्या अध्यक्षपदी शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांची ३ वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या सर्वात श्रीमंत म्हणून ओळखले जाणारे सिडको महामंडळाच्या अध्यक्षपदाचा पदभार



स्वीकारला. संजय शिरसाट यांची नियुक्ती १६ सप्टेंबर २०२४ पासून पुढील तीन वर्षासाठी करण्यात आल्याचे नगर विकास विभागाने सोमवार २३ सप्टेंबर रोजीच्या पत्रात म्हटले आहे. नवनिर्वाचित सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांच्याकडून सिडकोचे आर्थिक हित जपत येथील प्रकल्पग्रस्तांना न्यायची अपेक्षा आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, सर्वसामान्य नागरिकांसाठी परवडणारे घर असे धोरणात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा त्याच्या व्यक्त केली जात आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकमत Hello Navi Mumbai
Page No. 1 Sep 24, 2024

# शहरातील पाणीटंचाईवर सिडको काढणार तोडगा

## विजय सिंघल यांनी केली जलस्रोतांची पाहणी



शहरात ठिकठिकाणी असलेल्या जलस्रोतांची सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी अधिकाऱ्यांसह पाहणी केली.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** शहराच्या अनेक भागांत सध्या पाणी समस्या भेडसावत आहे. भविष्यात हा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने सिडकोने आतापासूनच उपाययोजना सुरू केल्या आहेत. वेगवेगळ्या भागांत नवीन जलस्रोत निर्माण केले जात आहेत. सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी सोमवारी या सर्व जलप्रकल्पांना भेट देऊन कामाचा आढावा घेतला.

सिडको अधिकार क्षेत्रासह नियोजित नैना प्रकल्पाला भविष्यात मोठ्या प्रमाणात गरज लागणार आहे. त्याअनुषंगाने सिडकोने विविध पाणीपुरवठा योजनांना गती दिली आहे. या प्रकल्पांची कामे निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी या भेटीदरम्यान, संबंधित कंत्राटदारांना दिल्या. यावेळी त्यांनी हेटवणे पाणीपुरवठा प्रकल्पाला भेट दिली. त्यानंतर त्यांनी हेटवणे धरणाच्या पायथ्याशी प्रस्तावित जलवाहिनीसाठी तयार केल्या जात असलेल्या बोगद्याची पाहणी केली.

### टंचाई रोखण्यासाठी जलप्रकल्प

१ भविष्यात सिडको कार्यक्षेत्रातील नागरिकांना पाण्याची टंचाई जाणवू नये, यादृष्टीने विविध उपाययोजना केल्या जात आहेत. अनेक ठिकाणी नवीन जलप्रकल्प उभारले जात आहेत. ही कामे समाधानकारक सुरू असून, निर्धारित कालावधीत पूर्ण होतील, असा विश्वास सिंघल यांनी व्यक्त केला आहे.

२ याप्रसंगी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प) शीला करुणाकरण, अधीक्षक अभियंता पी. व्ही. मूल आदींसह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

- जिते येथील जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी सिंघल यांनी पाणीपुरवठ्याशी संबंधित विविध लहान-मोठ्या प्रकल्पांना भेट देऊन पाहणी केली.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४

# नवी मुंबई विमानतळाच्या धावपट्टीला प्रवासी विमानाचे वेध

## महिनाभरात प्रवासी विमानाची चाचणी; देशांतर्गत सेवाही लवकरच

**कुणाल लोंढे, पनवेल**

देशांतर्गत विमानसेवा एप्रिलपासून सुरू करण्याच्या हालचाली सुरू असलेल्या, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर महिनाभरात प्रवासी विमानाची चाचणीही करण्यात येणार आहे. भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून धावपट्टी आणि धावपट्टीवरील सिग्नल यंत्रणेची चाचणी केल्यानंतर प्रवासी वाहनांची चाचणी सिडकोकडून सुरू झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात होत असलेल्या विमानतळाबाबत नवी मुंबईसह जिल्ह्यात आतुरता आहे. मार्च २०२५मध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या टप्प्यातील उड्डाण करण्यासाठी विमानतळाची कामे वेगाने सुरू आहेत. वेगवेगळ्या टप्प्यात सुरू होणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लि. ने ऑगस्टमध्ये भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या माध्यमातून विमान उड्डाणाच्या चाचण्याही केल्या. ऑगस्टमध्ये तीन दिवस झालेल्या चाचणीत यश आल्यानंतर पुढचे पाऊल टाकण्याची तयारी सिडकोने केली आहे. पहिल्या टप्प्यात मालवाहतूक सुरू करण्याची चर्चा होती, परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकत्याच केलेल्या विधानामुळे एप्रिल २०२५ पर्यंत पहिले विमान उड्डाण घेणार आहे. पहिल्या टप्प्यात आंतरराष्ट्रीय सेवा सुरू होणार नसून, पहिल्या टप्प्यात फक्त देशांतर्गत सेवा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून मिळणार आहे. देशांतर्गत विमान उड्डाण करण्यासाठी प्रवासी घेऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिले उड्डाण महिनाभरात म्हणजेच नोव्हेंबरमध्ये केले जाणार आहे, अशी माहिती सिडकोतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. नवी मुंबईतून आकाशात झेप घेणाऱ्या पहिल्या विमानात कोण बसेल याची उत्कंठा लागून असलेल्या नवी मुंबईकरांसाठी हा क्षण अभिमानाचा असणार आहे. सुमारे १८ हजार कोटी रुपये खर्च करून उभारण्यात येणाऱ्या नवी मुंबई विमानतळाचे भूमिपूजन २०१८मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते. दक्षिण दिशेकडील धावपट्टी आणि टर्मिनल टी वनचे काम शेवटच्या टप्प्यात आहे. त्यामुळे प्रवासी चाचणी झाल्यानंतर एप्रिल २०२५मध्ये देशांतर्गत विमानसेवेला प्रारंभ केला जाणार असल्याचे सिडकोचे म्हणणे आहे. त्यानंतर डिसेंबर २०२५पर्यंत नवी मुंबईतून आंतरराष्ट्रीय विमानसेवा सुरू करण्याचा सिडकोचा प्रयत्न सुरू आहे. पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीवर तयार झालेल्या विमानतळावरून प्रवाशांना घेऊन उड्डाण घेणारे विमान पाहण्यास सर्वच उत्सुक असणार आहेत.



> सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांचे विमानतळाच्या कामकाजावर बारकाईने लक्ष असून, एप्रिल २०२५मध्ये प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी सिडकोची तयारी सुरू आहे. प्रवासी चाचणी त्यापैकी एक भाग आहे.
>
> - प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in